नि.फौ.ख.क्र.२४९/२०२१
शासन–वि–माया मानेकर
नि.क्र.१८

मी शपथेवर खरे सांगतो की,

माझे नांव – मोहन जानरावजी हुस्नापुरे,
वय अंदाजे ६४ वर्ष, कामधंदा– शेती,
राहणार– काजळसरा, तालुका देवळी, जि.वर्धा

.....................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ ची सरतपासणी – सहायक सरकारी वकील श्री.एस.एम.दुंगे यांच्या मार्फत.**

१. मी फिर्यादी रत्नमाला बावनकर हिस ओळखते. मी आरोपी मायाबाई हिस देखील ओळखतो. ती आमचे गावात राहते. माझे शेत मौजा वाटखेडा शिवारात आहे. दिनांक १५.०२.२०२१ रोजी शेत फिर्यादीकडे बटईने होते. त्या दिवशी सायंकाळी ४.३० वाजताचे दरम्यान माझे शेतात इंधन ठेवलेले होते. माझेकडून खरेदी केलेले इंधन शेताच्या धु–यावर ठेवलेले होते. त्यादिवशी चना पिक काढण्याचे काम शेतात सुरु होते. त्यावेळी तेथे मी, फिर्यादी, तिचे पती, संजय कानेटकर व इतर मजुर हजर होते. आरोपी आली व तिने आगपेटीच्या काडीने सदरचे इंधन पेटवून दिले व तेथे न थांबता पश्चीम दिशेने निघून गेली. आरोपी ही तिचे आईचे शेताची वाहिती करीत असल्यामुळे त्या शेताशी आरोपीचा संबंध येतो. आरोपीच्या आईचे शेत व माझे शेत यामध्ये एक धुरा आहे. आरोपी वाहत असलेले शेत माझे शेताच्या उत्तर दिशेला आहे. पोलीस चौकशीसाठी माझेकडे आले होते व माझे बयाण घेतले होते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

उलट तपास आरोपीतर्फे – श्री.बी.डब्ल्यू. चौधरी विधीज्ञ यांचे मार्फत

२. फिर्यादी व माझे परिवारात चांगले संबंध आहेत. पोलिस चौकशीसाठी आले असता त्यांनी माझे शेताचा सातबारा उतारा मागितला नव्हता व तो मी दिलेला नाही. आरोपीचा शेताचा उतारा पोलिसांना दिला होता किंवा कसे याबाबत मला माहीत नाही. फिर्यादी व आरोपी यांचेमधील संबंधाबाबत मला काही माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी व

आरोपी यांचे बरेच दिवसांपासून एकमेकांशी पटत नाही. चना काढण्याचे मशीनचे बील पोलिसांना त्यावेळी मी दिले नव्हते कारण मीच मशीन बोलाविली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यादिवशी माझे शेतात चना नव्हता व तेथे चने काढण्याची मशीनही आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की शेताचे धु–यावर इंधनाची कंजी ठेवलेली नव्हती व ती आरोपीने पेटविली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सांगत असल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादीचे सांगण्यावरुन मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे. महसूल विभागातील लोक चौकशीसाठी घटनास्थळी आले नव्हते.

उलट तपास पुर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती
MRUNAL YASHWANT DOIPHODE
Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.04.02 15:41:12 +0530
(श्रीमती एम.वाय.डोईफोडे)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
वर्धा, दिनांक ०२–०४–२०२६

माझे समक्ष
MRUNAL YASHWANT DOIPHODE
Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.04.02 15:41:17 +0530
(श्रीमती एम.वाय.डोईफोडे)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
वर्धा, दिनांक ०२–०४–२०२६